पुण्यनगरी पु.पा.१

# नागरिकांच्या सुरक्षेसाठी बोळींज पोलीस ठाणे

## मुख्यमंत्र्यांनी केले ऑनलाइन उद्घाटन

**वसई :** मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या ताफ्यात नव्या बोळींज पोलीस ठाण्याची भर पडली आहे. शुक्रवारी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ऑनलाइन उद्घाटन केले.

पोलीस आयुक्तालयाच्या सुरुवातीला १३ पोलीस ठाणे कार्यान्वित होते. आणि सात पोलीस ठाणे प्रस्तावित होते. नंतर मागील तीन वर्षांत अनुक्रमे आचोळे, मांडवी, पेल्हार, नायगाव, काशिगाव पोलीस ठाणे कार्यान्वित झाले. शुक्रवारी बोळींज या १९व्या पोलीस ठाण्याचे उद्घाटन पार पडले. विरार आणि अर्नाळा पोलीस ठाणे हद्दीतील वाढते नागरीकरण आणि गुन्ह्यांचे वाढते प्रमाण यामुळे या दोन्ही पोलीस ठाण्याचे विभाजन होणे आवश्यक होते. या विभाजनामुळे



दाखल होणाऱ्या गुन्ह्यांपैकी ५० टक्के गुन्ह्यांचे विभाजन होईल आणि विरार, अर्नाळा पोलीस ठाण्यांवरील ताण कमी होईल. तसेच नागरिकांना ही जवळचे पोलीस ठाणे उपलब्ध होणार आहे. बोळींज पोलीस ठाण्यासाठी म्हाडाची इमारत क्र. २, चा पहिला मजला भाडेतत्त्वावर घेण्यात आला आहे. या ठाण्याचा भाडेखर्च पोलीस आयुक्तालयातील शासकीय निधीतून भागवण्यात येणार आहे. तसेच इमारतीची डागडुजी, पार्टिशन, फर्निचरच्या खर्चाचा निधी जिल्हा नियोजन समिती, पालघरकडून देण्यात आला आहे.

नवीन बोळींज पोलीस ठाण्याची हद्द विरार पश्चिमेकडील बोळींज, चिखल डोंगरी, नारिंगी, वायके नगर, मारंबळपाडा, डोंगरे, ज्युली बेट, पूनम नगर, राजीव नगर, पद्मावती नगर, वैतरणा खाडी, तिरुपती नगर, विराट नगर, यशवंत नगर, विठ्ठल नगर, गोकुळ टाऊनशिप, रानपाडा गाव, खारोडी, कमाणवाला नगर असणार आहे. या उद्घाटन सोहळ्याला उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस हे ऑनलाइन उपस्थित होते. तर खा.डॉ. हेमंत सावरा, आ. हितेंद्र ठाकूर, पालिका आयुक्त अनिलकुमार पवार, पोलीस आयुक्त मधुकर पाण्डेय, उपायुक्त पौर्णिमा चौगुले-श्रींगी, जयंत बजबळे हे प्रत्यक्षात उपस्थित होते.

---

← पुढारी पु.पा.४

**मरणाने केली सुटका, जगण्याने छळले होते!**

# नायगांव कोळीवाडा स्मशानभूमीची दुरवस्था

**वसई : अनिलराज रोकडे**

- **दहन करण्याच्या ठिकाणी छत नाही;**
- **मोबाईलच्या टॉचवर होतो अंत्यविधी!**

जीवनाच्या संघर्षमय रंगमंचावरील शेवट म्हणजे मृत्यू! गझल सम्राट सुरेश भट्ट मरणाने केली सुटका, जगण्याने छळले होते, असे आपल्या एका लोकप्रिय गझलमध्ये सांगून गेले आहेत. याचाच प्रत्यय आज वसई-विरार शहर मनपाच्या नायगांव कोळीवाडा येथील स्मशानभूमीत नागरिकांना येत आहे.

वसई तालुक्यातील नायगांव कोळीवाडा येथील स्मशानभूमीची दुरवस्था झाली आहे. या ठिकाणी दहन करण्याच्या ठिकाणी पत्रे गेल्या एक ते दिड महिन्यांपासून पावसामुळे पडले असून नागरिकांना पावसाळ्यात अंत्यविधी करता येत नाहीत. तसेच या स्मशानभूमीत विजपुरवठा खंडीत झाला की इन्व्हर्टर किंवा रिचार्जेबल बल्बची सुद्धा सोय नसल्यामुळे मोबाईलच्या टॉर्च किंवा स्कूटरच्या हेडलाईटवर अंत्यविधी करावा लागत असल्याने ग्रामस्थांनी संताप व्यक्त केला आहे.

वसई-विरार शहर पालिकेच्या हद्दित येणाऱ्या नायगांव कोळीवाडा येथील स्मशानभूमीची दयनीय अवस्था झाली आहे. मागील एक ते दिड महिन्यांपासून ही परिस्थिती अशीच आहे. यावर अद्यापही दुरुस्तीचे काम करण्यात आलेले नसून वसई-विरार मनपा या स्मशानभूमीवर दुर्लक्ष करत असल्याचा आरोप नागरीकांनी केला आहे.

शुक्रवारी रात्री ८.३० वाजताच्या दरम्यान नायगांव कोळीवाड्यातील एक मृतदेह अंत्यविधीसाठी स्मशानभूमीत नेतेवेळीच वीजपुरवठा खंडीत झाल्यामुळे स्मशानभूमीत खूप अंधार पसरला असतानाच नागरीकांनी मोबाईलच्या टॉचवर मृतदेह स्मशानभूमीत नेऊन काळोखात मोबाईलच्याच टॉच व स्कूटरच्या हेडलाईटवर अंत्यविधी करावा लागल्यामुळे नागरीकांनी संताप व्यक्त केला.

अनेकदा विनंती करुनही महापालिका या ठिकाणी दुर्लक्ष करत



असल्याचे नागरीकांनी सांगितले. नायगांव कोळीवाडा परिसरात मोठ्या प्रमाणात लोकवस्ती आहे; तर नायगांव स्टेशन परिसरापासून ते नायगांव रोजनगर या परिसरात नायगांव कोळीवाड्याची स्मशानभूमी सोडल्यास इतर कोणतीही स्मशानभूमी जवळ नाही. त्यामुळे नागरिक या स्मशानभूमीचा वापर करतात. अनेक वर्षांपासून या स्मशानभूमीची डागडुजी केलेली नाही. स्मशानभूमीतील ग्रील व लोखंडी एंगलही गंजल्यामुळे मोडकळीस आले आहेत.

लोकमत पु.पा.१.



## कंटेनरची धडक; तरुणाचा मृत्यू

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : नायगावच्या अमोलनगर येथील निलंबर सोसायटीत राहणाऱ्या ऐलटन फर्नांडिस (३०) या तरुणाचा अपघाती मृत्यू झाला आहे.

गुरुवारी पहाटे ४ वाजण्याच्या सुमारास मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील मौजे ससूनवघर गावाच्या हद्दीतील अशोक लेलंड गोडाऊनसमोर तरुणाच्या दुचाकीला भरधाव कंटेनरने ठोकर मारल्याने अपघात झाला. अपघातात मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव झाल्याने त्याचा मृत्यू झाला आहे. नायगाव पोलिसांनी आरोपी कंटेनर चालकाच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

लोकमत पा.नं.६.

# व्याजाने दिलेल्या पैशांच्या वसुलीसाठी केली मारहाण

## आचोळेत गुन्हा; सावकाराला केली अटक

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : कोणताही परवाना नसताना व्याजाने पैसे देऊन मनमानी पद्धतीने दमदाटी करून वसुली करणाऱ्या सावकाराविरोधात गुरुवारी सावकारी कर्जाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नालासोपारा पूर्वेकडील यशवंत विवा टाऊनशिप येथील शांती लाइफ स्पेस २ या इमारतीतील व्यापारी जयेश भानुशाली (४०) यांनी आचोळे पोलिस ठाण्यात तक्रार देऊन गुन्हा दाखल केला आहे. त्यांनी एप्रिल २०२३ ते आजपर्यंत सिरवी नावाच्या मिठाईच्या दुकानामध्ये शिवाजी राऊत यांच्याकडून १० टक्के व्याजाने १ लाख ४० हजार रुपये घेतले होते. त्यावेळी जयेश यांनी शिवाजी राऊत यांना कॅनरा व कोटक बँक खात्याचे आठ कोरे चेक व सहीचा स्टँप पेपर दिला. दोन महिन्यांनंतर त्यांनी त्यांना व्याज व मुदलासह एकूण १ लाख ४० हजार रुपये दिले. तरी राऊत यांनी त्यांच्या कारखान्यात व घरात घुसून त्यांची कॉलर पकडून त्यांच्या कानाखाली चापट मारून पैशाची मागणी केली. तेव्हा जयेश यांनी त्यास पैस देण्यास नकार दिल्याने वाद झाल्यावर आरोपी शिवाजी याने त्यांच्या सोसायटीमध्ये जाऊन शिवीगाळ करून धमकी दिली. त्यांच्या सहीच्या कोरा स्टॅम्प पेपरवर त्यांच्या संमतीशिवाय कारखान्याचे मशीन गहाण ठेवल्याचे स्वतःच लिहून घेऊन गैरवापर करून मशीन विकण्याची धमकी दिली. सावकारी कर्जाबाबत आचोळे पोलिसांनी ठाण्यात तक्रार आल्यावर आरोपीवर कारवाई केली आहे.

तक्रार आल्यावर सावकारी कर्जाचा गुन्हा दाखल केला आहे. आचोळे हद्दीत कोणाला सावकारी कर्जाचा त्रास कोणी देत असेल तर त्यांनी योग्य तो पुरावा आणि कागदपत्रांसह स्थानिक पोलिस ठाण्यात संपर्क साधावा.

- बाळासाहेब पवार, वरिष्ठ पोलिस निरीक्षक, आचोळे पोलिस ठाणे

लोकमत पु.पा.१.

## दुचाकी घसरून पडल्याने मृत्यू

नालासोपारा : चंदनसार रोडवरील मॅकविन टॉवरमध्ये राहणारे राधेश्याम चौरसिया (वय ५६) यांचा दुचाकी घसरून पडल्याने मृत्यू झाल्याची दुर्घटना घडली आहे. ते गुरुवारी सकाळी दुचाकीवरून वैतरणा ते विरार असा प्रवास करताना दुचाकी स्लीप होऊन ते खाली पडले. त्यांना उपचारासाठी संजीवनी हॉस्पिटलमध्ये नेले. तेथील डॉक्टरांनी तपासून त्यांना मृत घोषित केले. विरार पोलिसांनी अपघाती मृत्यूची नोंद केली आहे.

## तरुणाची आत्महत्या



नालासोपारा : मोरेगावच्या नालेश्वर नगर येथील अष्टविनायक अपार्टमेंटमध्ये राहणाऱ्या अभिषेक गुप्ता (वय २२) या तरुणाने गळफास लावून आत्महत्या केली आहे. त्याने बुधवारी रात्री गाळ्याच्या छताला फॅनच्या लोखंडी अँगलला ओढणीच्या सहाय्याने गळफास घेत आत्महत्या केली आहे. गुरुवारी तुळींज पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

## विहिरीत बुडून महिलेचा मृत्यू

नालासोपारा : धानिवबागच्या जीवदानी चाळीत राहणाऱ्या रिता पासवान (६५) या महिलेचा विहिरीत बुडून मृत्यू झाला आहे. गुरुवारी दुपारी साडेचार वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली आहे. घरातील लोकांनी त्यांना उपचारासाठी हॉस्पिटलमध्ये नेल्यावर तेथील डॉक्टरांनी मृत घोषित केले. पेल्हार पोलिसांनी अपघाती मृत्यूची नोंद केली आहे.

पुढारी पु.पा.१.

## वसईत आंदोलन

वसई : वसई-विरार महापालिका प्रभाग समिती जी प्रशासनाने एका कष्टकरी आदिवासी महिलेचा व चिमुकलीचा जीव घेतल्याचा आरोप करीत यांच्याच निषेधार्थ व भूमाफियांसह महानगरपालिका प्रभाग समिती जी च्या अधिकारी, प्र.सहा आयुक्त, उपायुक्त, अभियंते यांच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा व अट्रॉसिटी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करून घटनेची चौकशी उच्च अधिकाऱ्यांकडून करून एसआयटी गठीत करण्यात यावी, तपास नायगाव पोलीस ठाण्यातून काढण्यात यावा या मागणीसाठी १४ ऑक्टो. रोजी पो. उपआयुक्त परिमंडळ २ कार्यालय येथे सकाळी ११ वाजल्यापासून आंदोलन करण्यात येत असल्याचे ॲड. अनिल चव्हाण यांनी सांगितले.

CamScanner

लोकमत ५.५१.९.

# प्लास्टिकची तस्करी करणारा टेम्पो पकडला

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** केंद्र व राज्य शासनाने बंदी घातलेल्या प्लास्टिक पिशव्यांची बेकायदा तस्करी करणाऱ्या पिकअप जीपवर मीरा-भाईंदर महापालिकेच्या पथकाने कारवाई करून सुमारे ३ टनपेक्षा जास्त प्लास्टिक पिशव्यांचा साठा जप्त केला आहे.

बंदी असलेल्या प्लास्टिक पिशव्यांची काशीमीरा भागात बेकायदा तस्करी होत असल्याची माहिती महापालिकेस मिळाली. पालिका उपायुक्त डॉ. सचिन बांगर, सहायक आयुक्त योगेश गुणीजन, स्वच्छता निरीक्षक कांतीलाल बांगर यांच्या उपस्थितीत लिपिक, मुकादम, फेरीवाला पथक कर्मचारी यांनी जीप पकडली. गोण्यांमध्ये बंदी असलेल्या प्लास्टिक पिशव्यांचा साठा आढळून आला. ती जीप पालिकेने जप्त करून ठेवली होती. चालकाकडे चौकशी केली असता त्याने उल्हासनगर येथून प्लास्टिक साठा आणला होता व तो भाईंदर पश्चिम येथील एका मंदिराजवळ जाऊन प्लास्टिक घाऊक विक्रेत्यांना देणार होता, अशी माहिती पालिका सूत्रांनी दिली.




## १५ हजारांचा दंड वसूल

**१** पालिकेने जीपचालकाकडून बंदी असलेल्या प्लॅस्टिक पिशव्या प्रकरणी १५ हजार रुपयांचा दंड वसूल केला आहे. ताबा मिळवण्यासाठी काही प्लास्टिक विक्रेत्यांची धडपड सुरु असल्याचे समजते.

**२** प्लॅस्टिक पिशव्यांसह प्लॅस्टिक ग्लास, चमचे, प्लेट, स्ट्रॉ, थर्माकोल, पॉलिप्रोपिलीन, फ्लॅक्स आदींवर राज्य शासना आणि केंद्र शासनाने बंदी घातलेली आहे.

**३** प्लास्टिक हे मानवी आरोग्य, भटक्या जनावरांना, जलजीवांना तसेच पर्यावरणाला अतिशय घातक आहे. तसे असताना शहरात सर्रासपणे बंदी असलेल्या पिशव्या, प्लॅस्टिक वस्तूंचा वापर, विक्री सुरु आहे.

# स्कूल बसच्या धडकेत वसईत तरुणाचा मृत्यू

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** वसईच्या काजुपाडा येथे राहणाऱ्या लल्लन महतो (३५) या सायकलस्वाराचा स्कूल बसच्या धडकेत अपघातात मृत्यू झाला आहे.



बुधवारी रात्री साडेनऊ वाजण्याच्या सुमारास स्कूलबस चालक प्रायमस परेरा (४७) याने रस्त्यांच्या नियमाकडे व रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून त्याच्या ताब्यातील बस निष्काळजीपणे चालवल्याने सायकलस्वार लल्लन यांना बसच्या मागील बाजूचा धक्का लागला. यात सायकलस्वाराचा मृत्यू झाला. माणिकपूर पोलिसांनी आरोपी बसचालकाच्या विरोधात गुरुवारी गुन्हा दाखल करून त्याला अटक केली आहे.

CS CamScanner

पुढारी पृ. पा. ७.

पुण्यनगरी पा. नं. ६.

# पत्नीची भररस्त्यात गळा कापून हत्या

## पती-पत्नी वादातून हत्या; आरोपीस अटक

**मिरा रोड : पुढारी वृत्तसेवा**

मिरा रोड येथील नयानगर पोलीस ठाणे हद्दीत भर रस्त्यात पतीने पत्नीची चाकूने गळा कापून निर्घृण हत्या केल्याची घटना घडली आहे.

पती व पत्नीचा गेल्या काही महिन्यांपासून ठाणे जिल्हा न्यायालयात घटस्फोटाबाबत खटला सुरू. होता. न्यायालयाने मुलांचा ताबा आईकडे देण्याचे आदेश दिले होते. ती महिला मुलांना भेटण्यासाठी नयानगर येथे आली असता पती - पत्नीमध्ये वाद झाला. यावेळी भर रस्त्यात निर्दयी पतीने पत्नीची चाकूने गळा कापून निर्घृण हत्या केली. तेथील नागरिकांनी पकडून आरोपीला पोलिसांच्या ताब्यात दिले आहे.

मीरा रोड येथील नयानगर येथे राहणारे नदीम अहमद खान व अमरीन नदीम खान त्यांच्यात गेल्या काही महिन्यांपासून घरगुती भांडण सुरू होते. घरगुती वादातून दोघांचा घटस्फोटाचा खटला ठाणे न्यायालयात सुरू आहे. त्यांना एक मुलगा व एक मुलगी आहे. ऑगस्ट महिन्यात न्यायालयाने दोन्ही मुलांचा ताबा हा आईला द्यावा असे आदेश दिले. परंतु त्यानंतर देखील पती मुलांचा ताबा देत नव्हता. त्यामुळे त्या महिलेने पुन्हा न्यायालयात दाद मागितली तेव्हा पोलीस संरक्षणात १२ वर्षांची मुलगी व २ वर्षाचा मुलगा यांचा ताबा महिलेला देण्यात यावा, असे आदेश दिले होते. त्यानंतर ती महिला नयानगर पोलीस ठाण्यात पोलीस संरक्षण घेण्यासाठी गेली. रीतसर महिलेने पोलीस संरक्षणाचे पैसे भरले. त्यानंतर त्या महिलेला पोलीस संरक्षण देऊन तिच्या पतीच्या घरी गेले परंतु त्यावेळी घरी कोणीही नसल्याने ते परत आले. त्यानंतर नदीम याने पोलिसांना सांगितले की, मुले अजमेरला आजीसोबत गेले आहेत. त्यामुळे त्यांचा ताबा देता येणार नाही. ती महिला मुलीला भेटण्यास शाळेत जात असल्याची नदीमला माहिती मिळाली. त्यावेळी नदीमने त्याच्या पत्नीला शाळेबाहेर गाठले. यावेळी दोघांमध्ये वाद होऊन ही घटना घडली.

### भांडणातून चाकू हल्ला

भांडणातून पतीने पत्नीवर चाकूने हल्ला करत गळा कापला. यामध्ये ती महिला गंभीर जखमी झाली होती. नागरिकांनी आरोपीला पकडताच पोलीस तेथे पोहोचले व आरोपीला ताब्यात घेतले. पुढील तपास सुरू असल्याची माहिती उपायुक्त प्रकाश गायकवाड यांनी माहिती दिली आहे. पोलिसांनी या महिलेला अगोदरच सुरक्षा पुरवली असती तर ही घटना घडली नसती, असे नागरिकांकडून सांगितले जात आहे.

# भूल दाखवून वृद्धाची विरारमध्ये लूट

**वसई :** भूल दाखवून एका वृद्धाचे दागिने लुटण्यात आल्याचा प्रकार विरारमध्ये भरदिवसा घडल्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. धर्मानगर येथील जीवदानी अपार्टमेंटमध्ये राहणारे रमेश भोईर (६९) हे दुपारी विरार पश्चिमेला गेले होते. यावेळी तिशीतील दोन तरुण त्यांना मुख्य रस्त्यावरील राज वाइन्स शॉपसमोर भेटले. त्या अज्ञातांनी भोईर यांना अडवून त्यांच्या हाताला रुमाल चोळला. आणि त्यानंतर गळ्यातील सोन्याची चेन, अंगठी, घड्याळ असा ऐवज चोरून नेला. त्यानंतर भानावर आलेल्या भोईर यांना फसवणूक झाल्याचे लक्षात आले. त्यांनी थेट विरार पोलीस ठाणे गाठून गुन्हा दाखल केला.

# कर्जबाजारीपणातून खाडीत आत्महत्या

**वसई :** कर्जबाजारी झालेल्या विरारमधील नागरिकाने वर्सोवा खाडीत उडी मारून आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. विरारच्या फुलपाडा येथील वेद हाईट्समध्ये राहणारे बाळू लोंढे (५१) असे मृताचे नाव आहे. त्यांनी आत्महत्या करण्यापूर्वी झालेले कर्ज फेडू शकत नसल्याने आत्महत्या करीत असल्याचा मेसेज व्हॉट्सॲपद्वारे पत्नी आणि मुलाला पाठवला होता. त्यानंतर मंगळवारी रात्री ९.३० च्या सुमारास भाईंदर येथील खाडीत उडी मारून त्यांनी आत्महत्या केली. याप्रकरणी नायगाव पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

CamScanner

नवभारत पु.पा.४.

# भाजपा को मतदान करेगा जैन समाज

■ भाईंदर, (सं). मीरा-भाईंदर शहर में रहने वाले जैन समाज के लोग हमेशा से भारतीय जनता पार्टी का समर्थक रहे हैं. बदलते राजनीतिक समीकरण को देखते हुए मीरा-भाईंदर विधानसभा चुनाव प्रमुख एड. रवि व्यास ने शनिवार को भाईंदर पश्चिम स्थित माहेश्वरी भवन में जैन समाज के प्रबुद्ध लोगों और जैन संगठन से जुड़े लोगों की एक अहम बैठक का आयोजन किया गया था. व्यास की तरफ से पहले ही स्पष्ट कर दिया गया था कि पार्टी जिस व्यक्ति को भी यहां से अपना प्रत्याशी घोषित करेगी, उसे पूरी ताकत से संगठित होकर बड़ी जीत दिलाएंगे. उपस्थित जैन समाज तथा जैन संगठन से जुड़े लोगों ने एक स्वर में हामी भरी है कि जैन समाज पूरी तरह से भाजपा के पक्ष में मतदान करेगा. उपस्थित लोगों का साफ तौर पर कहना था कि पार्टी द्वारा जो भी प्रत्याशी घोषित किया जाएगा, उसके पक्ष में न सिर्फ मतदान किया जाएगा.




## माहेश्वरी भवन में हुई बैठक में लिया गया निर्णय

अपितु भाजपा की भारी जीत के लिए पूरी ताकत के साथ कड़ी मेहनत की जाएगी. वोटो का किसी भी कीमत पर विभाजन नहीं होने दिया जाएगा. बैठक में पूर्व विधायक नरेंद्र मेहता तथा वर्तमान विधायक गीता जैन के बीच चल रहे अशोभनीय आरोप प्रत्यारोप पर गहरी चिंता व्यक्त की गई. लोगों का साफ कहना था कि इससे जनमानस में दोनों नेताओं की छवि पर बुरा असर पड़ रहा है. आज की बैठक से साफ हो गया कि मीरा-भाईंदर का जैन समाज पूरी तरह से भारतीय जनता पार्टी के साथ खड़ा है.


लोकमत पु.पा.४.

# खबरदार बाटली, कॅनमध्ये पेट्रोल - डिझेल द्याल तर..!

## वसई-विरारमध्ये शासकीय यंत्रणांचे नियंत्रण : घटना नाही

फोटो स्टोरी
मंगेश कराळे

नालासोपारा : कोणत्याही पेट्रोल पंपावर बाटली वा कॅनमध्ये पेट्रोल-डिझेल देणे गुन्हा आहे. वसई-विरार शहरात या प्रकरणात पोलिस असो की जिल्हा पुरवठा विभाग आणि अन्य शासकीय यंत्रणा यांच्याकडून नियंत्रण ठेवले जात आहे. शहरात कोठेही बाटली, कॅनमधून पेट्रोल - डिझेल देताना दिसून आलेले नाही.



### 'लोकमत'ने काय पाहिले?

**साईबाबा पेट्रोल पंप :** नालासोपारा पश्चिमेकडील छेडा नगर परिसरात असलेल्या या पेट्रोल पंपावर 'लोकमत'च्या प्रतिनिधीने एक ते दीड तास पाहणी केली. पण, या ठिकाणी कोणालाही पेट्रोल बाटलीत किंवा कॅनमध्ये दिले नाही.

**स्वस्तिक पेट्रोल पंप :** नालासोपारा पश्चिमेकडील श्रीप्रस्था परिसरात असलेल्या या पेट्रोल पंपावर 'लोकमत'च्या प्रतिनिधीने एक तास पाहणी केली. पण, या ठिकाणी कोणालाही पेट्रोल बाटलीत किंवा कॅनमध्ये दिले नाही.

### आजपर्यंत एकही कारवाई नाही

पेट्रोल पंपावरून बाटली, कॅनमध्ये पेट्रोल-डिझेल देणे गुन्हा आहे. असे प्रकार शहरातील पंपावर घडत नाहीत, त्यामुळे पोलिसांकडून अशा प्रकरणात एकही कारवाई करण्यात आलेली नाही.

CamScanner

दैनिक भास्कर पा.नं.९.

अतिक्रमणः मनपा और पुलिस की उदासीनता से अवैध पार्किंग और गैरेज वालों का वसई की सड़क पर कब्जा

# वाहनों की पार्किंग बन रही परेशानी

- भाजपा ने दी आंदोलन की चेतावनी

गोपाल गुप्ता | वसई

वसई (पश्चिम) की प्रमुख सड़कें संकरी होती जा रही हैं। सड़कों पर गाड़ियों के शो रूम वालों, गैरेज और अवैध पार्किंग वालों ने कब्जा कर लिया है। सड़क पर हो रहे अतिक्रमण से वाहनों का आवागमन तो दूर पैदल चलना भी मुश्किल हो रहा है। इसके बावजूद वसई-विरार शहर महानगरपालिका प्रशासन और ट्रैफिक पुलिस की ओर से कोई ठोस कदम नहीं उठाया जा रहा है। सबसे अधिक परेशानी का सामना त्योहारों और शादी के सीजन में करना पड़ता है। आए दिन जाम से लोगों को जूझना पड़ रहा है। वसई-विरार भाजपा ने आरोप लगाया कि मनपा की उदासीनता से सड़क संकरी होती जा रही है। इससे एंबुलेंस, फायर ब्रिगेड और स्कूल बसों को काफी मुश्किलों का सामना करना पड़ता है।

वसई (पश्चिम) अंबाडी रोड एक व्यस्त सड़क है। 100 फीट की इस रोड से प्रतिदिन हजारों गाड़ियों का आवागमन होता है, लेकिन इन दिनों सह सड़क संकरी हो गई है। सड़क के दोनों तरफ दुकानदारों का अतिक्रमण है। इसके अलावा गैरेज और शो रूम वालों ने कब्जा कर लिया है। ये लोग अवैध रूप से सड़क के दोनों तरफ गाड़ियां पार्किंग कर रखी है। सुबह होते ही दुकानदारों द्वारा सामान निकालकर सड़क पर सजा दिया जाता है। शाम तक यही स्थिति रहती है। ऐसे में दुकानों पर आने वाले ग्राहक अपने वाहन सड़कों पर ही खड़ा कर देते हैं, जिससे सड़क एकदम पैक हो जाती है और जाम लगा जाता है। प्रशासन को राहगीरों के आवागमन में हो रही दिक्कत और सड़कों पर हुए अतिक्रमण की जानकारी होने के बावजूद स्थिति जस की तस बनी है।






**मनपा प्रशासन सिर्फ चेतावनी देता है:** एक स्थानीय निवासी ने बताया कि कार्रवाई के नाम पर प्रशासन की तरफ से सिर्फ चेतावनी ही दी जाती है। एक से दो दिन बीतने के बाद फिर दुकानदारों द्वारा सड़क पर सामान सजाकर अतिक्रमण कर लिया जाता है। इससे स्कूल बस एंबुलेंस, फायर ब्रिगेड की गाड़ी जाम में फंस जाती है। ऐसे में जाम की समस्या कम होने की बजाए दिन पर दिन बढ़ती ही जा रही है।

**समस्या धीरे-धीरे बढ़ रही:** वसई-विरार की सड़कों को अतिक्रमण मुक्त कराने के लिए लंबे समय से अभियान नहीं चला, जिससे यह समस्या धीरे-धीरे बढ़ती जा रही है। हालांकि सड़कों पर लग रही सब्जी की दुकानों को हटवाकर मनपा प्रशासन अपनी पीठ तो थपथपा लेता है, लेकिन सड़क के दोनों तरफ सज रही दुकानों पर ध्यान नहीं देता है। अधिकारियों की उदासीनता के चलते लोगों को जाम की समस्या से रोजाना रू-ब-रू होना पड़ रहा है।

वसई क्षेत्र में सड़क किनारे खड़ी बाइक पर ट्रैफिक पुलिस द्वारा कार्रवाई की जाती है, लेकिन वर्षों से सड़क पर अवैध रूप से पार्किंग कर कारोबार करनेवाले पर कोई कार्रवाई नहीं होती। पुलिस और मनपा का ये दोहरा चेहरा सामने आया है। दोनों विभाग सिर्फ गरीबों परेशान करता है और जुर्माना वसूला है। अगर सड़क खाली नहीं कराई गई तो भाजपा आंदोलन करेगी।
**-मनोज पाटील,** भाजपा नेता

दुकानों को नोटिस दिया गया है। साथ ही ट्रैफिक विभाग को पत्र दिया है। मनपा और ट्रैफिक विभाग एक अभियान के तहत संयुक्त कार्रवाई करेंगे।
**-मनोज वनमाली,** सहायक आयुक्त वसई-विरार मनपा

# बैग में तीन चाकू लेकर घूम रहा था पति नदीम

## एक दिन पहले ही रची थी हत्या की साजिश

← दैनिक भास्कर पा.नं.३.

भास्कर संवाददाता | भाइंदर



बच्चों की कस्टडी के विवाद में मीरा रोड में पत्नी की गला रेतकर हत्या करने के मामले में एक खुलासा हुआ है। जांच में पता चला है कि आरोपी एक दिन पहले ही पत्नी की हत्या की साजिश रची थी और एक नहीं, बल्कि तीन चाकू लेकर उसकी तलाश में घूम रहा था। उसके बैग से तीनों चाकू बरामद हुए हैं। पत्नी अमरीन की हत्या के आरोप में पुलिस ने नदीम अहमद खान के अलावा उसकी मां सबीना को भी गिरफ्तार किया है। फिलहाल दोनों सात दिन की पुलिस कस्टडी में हैं। अमरीन और आरोपी नदीम दोनों बच्चों को अपने पास रखना चाहते थे, लेकिन बच्चों के नसीब में कुछ और ही मंजूर था। नया नगर पुलिस स्टेशन के वरिष्ठ पुलिस निरीक्षक विलास सूपे ने बताया कि दोनों बच्चे बुआ के घर हैं। पीआई सूपे के मुताबिक, गुरुवार को बच्चों की कस्टडी पाने के लिए अमरीन पुलिस के साथ पति के घर गई थी, तब घर बंद मिला था। इस बात की जानकारी नदीम को हो गई थी। उसे मालूम था कि अगले दिन यानी शुक्रवार को भी अमरीन आ सकती है। इसके लिए उसने उसकी हत्या की तैयारी पहले ही कर ली थी। आरोपी पेशे से इंटीरियर डिजाइनर है। एक महीना पहले भी दंपती के बीच झगड़ा हुआ था और दोनों ने एक-दूसरे के खिलाफ शिकायत दर्ज कराई थी।

CS CamScanner

N. B.T. पान क्र. 8

# मीरा-भाईंदर विधानसभा सीट पर शिवसेना ने ठोका दावा

## विधानसभा प्रभारी विक्रमप्रताप सिंह को उम्मीदवार बनाने की मांग

■ **अमित तिवारी, मीरा-भाईंदर:** मीरा-भाईंदर की राजनीति में शनिवार को हलचल पैदा हो गई। यहां शिवसेना (शिंदे गुट) ने मीरा-भाईंदर विधानसभा (145) सीट पर अपना दावा ठोक दिया। जिला प्रमुख राजू भोईर ने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे को पत्र लिखते हुए यह सीट अपने पक्ष में लेने की मांग की है। पत्र में यह भी लिखा है कि पार्टी के मीरा-भाईंदर विधानसभा प्रभारी विक्रमप्रताप सिंह उम्मीदवार होंगे। इस बारे में पार्टी ने प्रस्ताव भी पारित कर दिया है। पत्र में लिखा है कि मीरा-भाईंदर किसी भी पार्टी (महायुति के दल) का गढ़ नहीं है। फिलहाल, यहां से गीता जैन निर्दलीय विधायक हैं। जैन ने एकनाथ शिंदे सरकार को समर्थन भी दे रखा है। पिछले विधानसभा में जैन ने बीजेपी प्रत्याशी नरेंद्र मेहता को हराया था।

**यह हमारी परंपरागत सीट है:** बीजेपी जिलाध्यक्ष किशोर शर्मा ने कहा कि मीरा-भाईंदर में हमारे पास 2/3 से अधिक नगरसेवक (पूर्व) हैं। मीरा-भाईंदर हमारी परंपरागत सीट है। यहां से केवल और केवल बीजेपी का उम्मीदवार होगा।



### कौन हैं विक्रमप्रताप सिंह

**सिंह मीरा-भाईंदर सहित राज्य में शिवसेना का उत्तर भारतीय चेहरा हैं। वह विधायक प्रताप सरनाईक और मुख्यमंत्री एकनात शिंदे के करीबी माने जाते हैं। शिवसेना ने उन्हें उत्तर प्रदेश राज्य का प्रभारी भी नियुक्त किया है। सिंह राज्य में शिवसेना और उत्तर भारतीय समाज के बीच ब्रिज का काम कर रहे हैं।**

### जैन के लिए नई दुविधा

शिवसेना के इस पत्र ने जैन के लिए नई दुविधा खड़ी कर दी है। जैन फिलहाल दो नावों पर सवार हैं। वह बीजेपी और शिवसेना दोनों से टिकट की उम्मीद में है। बीजेपी में उन्हें पहले से इच्छुक उम्मीदवार नरेंद्र मेहता और रवि व्यास से चुनौती मिल रही है। अब विक्रम के नाम ने उनकी दुविधा और बढ़ा दी है।



**"उम्मीदवारी की मांग करना सबका हक है। अंतिम निर्णय पार्टी के वरिष्ठ नेता लेते हैं।**

*– गीता जैन, विधायक*

**"यह पत्र 30 सितंबर को सीएम को दिया गया था। हम महायुति के किसी भी उम्मीदवार के लिए काम करेंगे।**

*– प्रताप सरनाईक, विधायक*



**"मीरा-भाईंदर में बीजेपी का हमेशा से वर्चस्व रहा है। जिलाध्यक्ष राजू भोईर की यह मांग अव्यवहारिक है।**

*– रवि व्यास, चुनाव प्रभारी*



# तड़ीपार की गई महिला को किया गिरफ्तार

■ **निसं, नालासोपारा:** आचोले पुलिस स्टेशन की हद में ड्रग्स की तस्करी करने वाली महिला आरोपी को पुलिस ने जून में 2 साल के लिए पांच जिलों से तड़ीपार किया था। वह चोरी-छिपे नालासोपारा में रह रही थी। पुलिस ने उसे गिरफ्तार किया है। शारदा उर्फ़ कुडी गोपी बंजारा ड्रग्स की तस्करी करती है। पुलिस ने उसके खिलाफ एक दर्जन से अधिक मामले दर्ज किए हैं। वह कई बार जेल जा चुकी है। हाल में वह जेल से रिहा होकर आई थी। इसके बाद पुलिस कमिश्नर मधुकर पांडे के आदेश पर उसे 18 जून 2024 को पांच जिलों से तड़ीपार किया गया था।

N. B.T. पान क्र. 9

## पेड़ से लटकता मिला अज्ञात शव

■ **निसं, वसई:** वालीव गांव में अज्ञात व्यक्ति का शव पेड़ से लटकता मिला। नन्नू गोविंद बटवारे ने पुलिस को सूचना दी थी कि व्यक्ति का शव लटक रहा है।

CamScanner

N.B.T. पान क्र. 8

# काला फीता बांधकर काम करेंगे मनपा के अधिकारी-कर्मचारी



■ निसं, विरार: शुक्रवार को आगरी सेना के नेता कैलाश पाटील कार्यकर्ताओं के साथ नालासोपारा की 41 इमारतों के पुनर्वसन मामले पर मनपा आयुक्त से मिलने गए थे। आयुक्त के न मिलने पर अतिरिक्त आयुक्त संजय हेरवडे से मिले। आरोप है कि इस दौरान किसी बात पर बहस हुई और कार्यकर्ताओं ने उनके साथ गाली-गलौज और धक्का-मुक्की की। इसके विरोध में मनपा के अधिकारी-कर्मचारी काला फीता बांधकर सोमवार को विरोध करेंगे।

**आगरी सेना पर अतिरिक्त आयुक्त से धक्का-मुक्की का आरोप**

आरोप है कि बातचीत के दौरान आगरी सेना के लोग आक्रामक हो गए थे। इस दौरान, उन्होंने संजय हेरवडे और उपायुक्त सदानंद पुरव के गाली-गलौज की। दोनों अधिकारियों ने उन्हें शांत कराया, तो वे धक्का-मुक्की करने लगे। इस दौरान, वहां मनपा के सुरक्षाकर्मी पहुंच गए और उन्हें हटाने लगे, तो उन्होंने तोड़-फोड़ शुरू कर दी। घटना के बाद देर शाम को मुख्यालय में कमिश्नर अनिल कुमार पवार की मौजूदगी में जन आक्रोश सभा हुई। सर्वसम्मति से निर्णय लिया गया कि आरोपियों के विरुद्ध कानूनी कार्रवाई की जाए। वहीं, आगरी सेना के प्रवक्ता जयेश पाटील ने कहा कि सारे आरोप गलत हैं।

Mid Day Page no. 5

# NHAI installs signage to avoid accidents on Mum-Ahd highway

## Motorists have frequently been confused due to the height differences between concrete and asphalt lanes

**DIWAKAR SHARMA**
diwakar.sharma@mid-day.com

IN a bid to keep the flow of traffic smooth and avoid confusion among road users on the Mumbai-Ahmedabad highway—where the white-topping work is underway on a 121-km stretch—the National Highways Authority of India (NHAI) has installed important signage like "Go Slow", "Traffic Diversion" and "Work in progress". These installations are a welcome measure, as motorists have frequently encountered accidents due to the height differences between concrete and asphalt lanes.

The manager (technical) of the Mumbai-Ahmedabad Highway of NHAI, Sumeet Kumar, said, "The white-topping work is underway at around 10 different locations on NH-48. The contractor has implemented necessary safety measures, including diversion signage, blinkers, delineators, and traffic wardens. Ramps have also been installed at the end of the white-topping and at regular intervals to facilitate the safe ascent and descent of vehicles."



The work is ongoing on a 121-km stretch of NH-48

Kumar further told mid-day that the white-topping work is complete on more than 71 km out of the 121-km stretch on NH-48, and "we are hopeful that the ongoing white-topping project will be completed by April 2025".

"White-topping has been taken up as a long-term solution to the issue of potholes and maintenance requirements. High-priority stretches, where damages were noticed during last monsoon, were taken up first and white-topping on 71 km is completed," he added.

"White-topping is done in lane-by-lane manner, as full width white-topping is not allowed by the administration, due to heavy traffic and difficulty in managing both sides' traffic on one side of carriageway," he added.

Speaking about the potholes on the asphalt lanes, Kumar claimed that "all these damages have been repaired during a dry spell in the monsoon. The maintenance of the bituminous stretch, where white-topping couldn't be done, has been taken up on war footing."

"Additionally, at some locations, lanes with white-topping were damaged due to premature traffic openings by road users. For instance, when a heavy vehicle is stuck in a traffic jam, drivers often do not wait for traffic personnel to regulate the flow; instead, they attempt to drive over the sections that need more time to properly open. These damages are also being repaired by the contractor," he added.

CamScanner